**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मालदिव दौऱ्यात उभय देशांमधे तीन करार आणि ४ सामंजस्य करार

- संसदेच्या पावसाळी अधिवेशनात पाचव्या दिवशीही दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ, कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- ५५व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या संघानं पटकावली ३ सुवर्ण आणि २ रौप्यपदकं

- अँडरसन-तेंडुलकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्याच्या पहिल्या डावात इंग्लंडची भारतावर आघाडी

**आणि**

- फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी उद्या भारताच्याच कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यात लढत

**<><><><><>**

भारत आणि मालदीव हे देश फक्त शेजारी नाहीत, तर सहप्रवासी आहेत. मालदीवचा विकास आणि समृद्धीसाठी भारत प्रत्येक पावलावर साथ देईल, अशी ग्वाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिली. मालदीव दौऱ्याच्या पहिल्या दिवशी मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांच्यासोबत त्यांनी वार्ताहरांना संबोधित केलं. भारताच्या मदतीनं मालदीवमध्ये उभारलेल्या विविध प्रकल्पांमुळे दोन्ही देशांमधले संबंध नव्या उंचीवर गेले आहेत, असं ते म्हणाले. द्विपक्षीय गुंतवणूक करार, हवामान क्षेत्रातलं सहकार्य, नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्रांध्ये दोन्ही देशांमधलं सहकार्य वाढवण्यावर त्यांनी भर दिला. भारत-प्रशांत क्षेत्रात शांती, स्थिरता आणि समृद्धी हे भारत आणि मालदीव यांचं समान ध्येय आहे, असं ते म्हणाले.

मोदी यांच्या उपस्थितीत आज ४ सामंजस्य करार आणि इतर तीन करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या असून यामुळे मालदीवच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असं मुइझ्झू यांनी यावेळी सांगितलं. यात ५६५ मिलियन अमेरिकी डॉलरच्या लाइन ऑफ क्रेडिट कराराचा समावेश असून, यामुळे मालदीवच्या संरक्षण, क्रीडा, आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण क्षेत्राला मदत होईल, असं ते म्हणाले. भारत आणि मालदीव मुक्त व्यापार कराराबाबतच्या चर्चेला सुरुवात झाली असल्याचं मुइझ्झू यांनी नमूद केलं.

तत्पूर्वी आज मालेमधे रिपब्लिक स्क्वेअर इथं प्रधानमंत्री मोदी यांना बंदुकीच्या २१ फैरी झाडून सलामी देण्यात आली. मोदी यांनी अध्यक्ष मुइझ्झू यांच्याशी दोन्ही देशांच्या हितसंबंधाबाबतच्या विविध विषयांवर द्विपक्षीय चर्चा केली. त्यानंतर भारत आणि मालदीव यांच्यात प्रतिनिधीमंडळ स्तरावर चर्चा झाली. भारत आणि मालदीव यांच्यातल्या राजनैतिक संबंधांना ६० वर्षं पूर्ण झाल्याप्रीत्यर्थ एका विशेष तिकिटाचं लोकार्पण मोदी आणि मुइझ्झू यांनी केलं. त्यानंतर दोन्ही देशांदरम्यान विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. त्यानंतर भारताच्या मदतीनं हुलहुमाले इथं बांधलेल्या तीन हजारापेक्षा जास्त घरकुलांचं लोकार्पण आणि अड्डू शहरातले रस्ते आणि जलनिस्सारण यंत्रणेचं उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते झालं. त्यानंतर मोदी आणि मुइझ्झू यांनी मालदीवमधल्या ६ विकास प्रकल्पांचं उद्घाटन केलं.

उद्या मालदीवच्या ६०व्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात प्रधानमंत्री मोदी सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या आजच्या पाचव्या दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ झाल्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

लोकसभेत सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर २६व्या करगिल विजय दिवसानिमित्त सर्व सभासदांनी या युद्धात वीरश्री गाजवलेल्या जवानांना अभिवादन केलं आणि यात शहीद झालेल्यांच्या स्मरणार्थ मौन पाळलं. त्यानंतर बिहारच्या मतदार यादी पुनरीक्षणासह इतर मुद्द्यांवर गदारोळ होत राहिल्यानं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब, आणि नंतर सोमवारपर्यंत तहकूब झालं.

तत्पूर्वी अधिवेशनाचं कामकाज सुरळीतपणे चालावं यासाठी बिर्ला यांनी आज लोकसभेत सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. सोमवारपासून प्रश्नोत्तराच्या तासाचं कामकाज नीटपणे व्हावं असं आवाहन बिर्ला यांनी बैठकीत केलं. या बैठकीला भाजपा, काँग्रेस, समाजवादी पार्टी, संयुक्त जनता दल आणि तृणमूल काँग्रसचे नेते यावेळी उपस्थित होते.

राज्यसभेत कामकाजाच्या सुरुवातीला कमलहासन यांच्यासह तमिळनाडूच्या इतर नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी झाला. त्यानंतर, गदारोळामुळे कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थासाठीच्या रेल्वेच्या योजनांचा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू यांनी आढावा घेतला. प्रयागराज इथं झालेल्या महाकुंभच्या अनुभवावरून लगतच्या सर्व स्थानकांवर पुरेशा सुविधा विकसित करण्याची सूचना वैष्णव यांनी अधिकाऱ्यांना केली.

अधिकाऱ्यांनी सांगितलं की, नाशिक परिसरातल्या नाशिक रोड, देवळाली, ओढा, खेरवाडी आणि कसबे सुकेणे या पाच प्रमुख स्थानकांवरून प्रवासी वाहतुकीचं व्यवस्थापन केलं जाईल. यासाठी या स्थानकांवरच्या प्रस्तावित कामांचा खर्च एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल.

**<><><><><>**

५५व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या ५ जणांच्या संघानं ३ सुवर्ण आणि २ रौप्यपदकं पटकावली. पुण्याचा कनिष्क जैन, जबलपूरचा स्नेहिल झा आणि इंदोरचा रिद्धेश बेंडाळे यांनी सुवर्ण, तर सूरतचा आगम शहा आणि कोटा इथला रजित गुप्ता यांनी रौप्यपदकाची कमाई केली. पॅरिस इथं झालेल्या या स्पर्धेत भारतानं पदकतालिकेत पाचवा क्रमांक मिळवला.

<><><><><>

अँडरसन-तेंडुलकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात आज तिसऱ्या दिवशी यजमान इंग्लंडनं पहिल्या डावात भारतावर आघाडी घेतली. इंग्लंडमधे मँचेस्टर इथं सुरू असलेल्या या कसोटीत काल भारताचा पहिला डाव ३५८ धावांत आटोपला. इंग्लंडनं कालच्या दोन बाद २२५ धावांवरून आज खेळ सुरू केला, आणि भारताची धावसंख्या पार केली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या ४ बाद ४३२ धावा झाल्या होत्या. बेन स्टोक आणि जो रूट यांच्या भागीदारीमुळे इंग्लंडच्या डावाला आकार आला आहे. रूटने शानदार शतक झळकावलं आहे.

<><><><><>

फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारताच्याच कोनेरू हंपी आणि दिव्या देशमुख या दोघींमध्ये उद्या अंतिम लढत होणार आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीत दिव्या देशमुख हिनं चीनची ग्रँडमास्टर तान झाँगयी हिच्यावर मात केली, तर कोनेरू हंपीनं चीनची ग्रँडमास्टर लेई टिंगजिए हिचा पराभव केला. आता या स्पर्धेचं जेतेपद आणि उपविजेतेपद भारताकडे येणार आहे. भारतासाठी हा बुद्धिबळाच्या पटावरचा मोठा मैलाचा दगड ठरणार आहे.

<><><><><>

जागतिक बाजारातल्या संमिश्र वातावरणामुळे आज देशातल्या शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी मंदीचं सावट राहिलं. मुंबई शेअर बाजाराचा

सेन्सेक्स ७२१ अंकांनी कोसळून ८१ हजार ४६३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही २२५ अंकांची मोठी घसरण झाली आणि तो २४ हजार ८३७ अंकांवर बंद झाला. जागतिक व्यापारातल्या अनिश्चिततेमुळे परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी विक्रीचा सपाटा लावल्यानं गुंतवणूकदारांमधे निरुत्साह दिसून आला.

**<><><><>**

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यात सरकारी उच्च प्राथमिक शाळेची इमारत कोसळून सात विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर २०पेक्षा जास्त विद्यार्थी जखमी झाले. गावकऱ्यांनी तातडीनं जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल केलं. गंभीर जखमी असलेल्या १२ विद्यार्थ्यांना झालावार वैद्यकीय रुग्णालयात हलवल्याची, तर ९ मुलांवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती झालावारच्या पोलीस अधीक्षकांनी दिली.

**<><><><>**

भारतीय लष्करासाठी संरक्षण मंत्रालय भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडकडून हवाई संरक्षण आग नियंत्रण रडार प्रणालीची खरेदी करणार आहे. नवी दिल्लीत संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग यांच्या उपस्थितीत त्यासाठीच्या खरेदी करारावर आज स्वाक्षऱ्या झाल्या. या रडारमुळे शत्रूची लढाऊ विमानं, हेलिकॉप्टर्स आणि ड्रोनसह सर्व प्रकारचे हवाई धोके शोधता येणार असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

दक्षिण कोरियाचे माजी राष्ट्राध्यक्ष युन सुक येऊल यांनी पदावर असताना गेल्या ३ डिसेंबरला लागू केलेल्या मार्शल लॉमुळे सामान्य कोरियावासीयांना झालेल्या मनस्तापाच्या बदल्यात त्यांनी नागरिकांना नुकसानभरपाई द्यावी असे आदेश सेऊल मध्यवर्ती जिल्हा न्यायालयानं आज दिले. १०४ नागरिकांनी येऊल

यांच्याविरोधात न्यायालयात दाद मागितली होती. भावनिक नुकसान झालेल्या या प्रत्येकाला एक लाख वोन देण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत.

//<><><><><>//